महासागर अमरावती
शनिवार, दि. 28 सप्टेंबर 2024
पान 3

# नितेश राणेंच्या दौऱ्यामूळे अचलपूरात हाय अलर्ट

## जिल्ह्याभरातील पोलीस आज होणार दाखल

- एसआरपीएफची तुकडीही तैनात
- पोलिसांचे समाजमाध्यमांवर लक्ष

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर/अमरावती,(दि.27)** - आपल्या प्रक्षोभक भाषणामूळे अल्पसंख्याक समुदायाकडून ज्यांचा प्रचंड विरोध होत आहे, असे भाजपचे नितेश राणे 29 सप्टेंबर रोजी अचलपूर दौऱ्यावर असल्याने दोन समुदायात तणाव निर्माण होण्याची भीती निर्माण झाली आहे. ज्यामूळे जिल्ह्याभरातील पोलीस उद्या शनिवारी अचलपूरात दाखल होणार आहे. सोबतच एसआरपीएफ तुकडी लावाजमासह अचलपूरात दाखल होत आहे. सोबतच शहर, जिल्हा पोलिसांकडून सर्व समाजमाध्यमांवर लक्ष ठेवले जात आहे. जेणे करुन कुणीही सांप्रदायिक हिंसा होईल असे चिथावणीखोर वक्तव्य करणार नाही. अचलपूरसह परतवाडा शहरात पोलिसांचा हाय अलर्ट आहे.

भाजप आमदार नितेश राणे यांनी नुकतेच वादग्रस्त वक्तव्य केले होते. ज्यामूळे अल्पसंख्याक समुदायांमध्ये रोष पहायला मिळाला. काही झाले तरी नितेश राणे यांना



अचलपूरात येवू देणार नाही अशी भूमिका एका गटाने घेतलेली असताना, आम्हाला कोण अडविणार असे आव्हान देत रविवार (29 सप्टेंबर) रोजी हिंदुत्ववादी संघटनांनी अचलपूर शहरातून नितेश राणे यांच्या बाईक रॅलीचे आयोजन केले आहे. ज्यामूळे अचलपूर सांप्रदायिक बारुदीचा ढीगारा बनले आहे, ज्यावर वादाची एक ठिणगी पेट घेवू शकते. हा प्रकार टाळण्याकरिता पोलीस प्रशासनाने आपली पुर्ण ताकद खर्ची घातली आहे. दोन्ही गटांना आवरण्याकरिता शर्थीचे प्रयत्न केले जात आहे.

### तीन ठाण्यांचे आज शक्तीप्रदर्शन

अचलपूर, सरमसपूरा व परतवाडा पोलिसांकडून उद्या शनिवारी आपआपल्या क्षेत्रात शक्तीप्रदर्शन केले जाणार आहे. 100 हून अधिक पोलीस वाहनेही अचलपूरात दाखल होणार असल्याची माहिती आहे. पुढील दोन दिवस अचलपूरसह परतवाड्यात पोलिसांचा हाय अलर्ट आहे.

### 400 हून अधिक पोलीस तैनात

43 अधिकाऱ्यांसह 250 हून अधिक पोलीस अंमलदार व इतर तुकड्या पकडून 400 पोलीस अचलपूर, परतवाड्यात तैनात करण्यात येणार आहे. कुणीची समाजमाध्यमांवर चिथावणीखोर संदेश प्रसारित करु नये किंवा वक्तव्य करु नये असे आवाहन पोलीस विभागाकडून करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्याभरात कलम 163 बिएनएस नुसार पुढचे दोन दिवस प्रतिबंधात्मक आदेश दिले पारित केले आहे.

# शहरात 492 दुर्गा, 102 शारदा देवींची स्थापना

### 64 ठिकाणी गरबा रासचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.27)** - नवरात्रोत्सवाला 3 ऑक्टोंबरपासून सुरुवात होत आहे. त्यामूळे नवदुर्गा व शारदा देवी मंडळांच्या जय्यत तयारी सुरु झाल्या आहेत. अमरावती शहरातील दहा पोलिस ठाण्याच्या हद्दीत यंदा 492 दुर्गा तर 102 शारदा देवी मुर्तीची स्थापना होणार असून, 64 ठिकाणी रास गरबा खेळला जाणार आहे. या अनुषंगाने पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले असून, महिलांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने चोख बंदोबस्त लावण्यात येणार आहे.

नवरात्रोत्सवाचा दरवर्षी उत्साह शिगेला पोहोचतो. खास करून महिलांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहायला मिळते. नवदुर्गा व शारदा देवी मंडळांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. विशेष म्हणजे नवरात्रोत्सवात रास गरबा खेळला जात असल्याने तरुणाईमध्ये आनंदाचे वातावरण असते. 3 ऑक्टोबरपासून अश्विन नवरात्रीला सुरुवात होत आहे. या अनुषंगाने पोलीस प्रशासनही सज्ज झाले आहे.

### गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई

कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलिसांनी गुन्हेगार प्रवृत्तीवर विशेष लक्ष केंद्रीत केले असून, गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाया सुरु केल्या आहेत. गुन्हेगार प्रवृत्तींच्या लोकांना कडक सुचना देण्यात येत आहे. तसेच या उत्सवाच्या काळात पोलिसांची गस्त वाढविण्यात येणार आहे. दामिनी पथक महिलांच्या सुरक्षेसाठी सज्ज करण्यात आल्या आहेत.

### सीसीटीव्ही अनिवार्य, महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य

नवरात्रोत्सवाच्या अनुषंगाने सीपी नवीनचंद्र रेड्डी यांनी नुकतीच बैठक घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस अधिकारी तथा दुर्गोत्सव मंडळांना विविध सुचना केल्या आहेत. अंबा देवी व एकविरा देवी मंदिरावर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रीत केले असून, या परिसरावर सीसीटीव्ही कॅमेर्यांचा सर्वाधिक वॉच राहणार आहे.

### पोलिस ठाणे निहाय दुर्गा व शारदा मंडळ

| स्टेशन | दुर्गा | शारदा | गरबा रास |
|---|---|---|---|
| राजापेठ | 59 | 05 | 22 |
| कोतवाली | 22 | 00 | 07 |
| खो. गेट | 59 | 09 | 09 |
| भातकुली | 19 | 24 | 00 |
| गाडगेनगर | 80 | 06 | 06 |
| वलगाव | 31 | 20 | 00 |
| नागपुरी गेट | 26 | 02 | 00 |
| फ्रेजरपुरा | 75 | 18 | 12 |
| बडनेरा | 80 | 06 | 06 |

# नवीन तहसिल कार्यालयात चोरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.27)**- अमरावती तहसिल कार्यालयाचे स्थानातंरण झाले आहे. परंतू जुन्या ठिकाणी काही साहित्य व बॅटर्या ठेवल्या होत्या. परंतू या जुन्या तहसिल कार्यालयातील बॅटर्या व अन्य काही साहित्य चोराने लंपास केल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. 89 हजाराचा मुद्देमाल बॅटऱ्या संगणक, यूपीएस चोरी झाली.

### 89 हजाराचा मुद्देमाल लंपास



शुक्रवारी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर कोतवाली पोलिसांनी पाचारण केले. डॉग स्कॉड, फिंगर प्रिन्ट एक्सपर्टने तपास कार्य सुरु केले होते. या जुन्या तहसिल कार्यालयात कोणकोणते साहित्य चोरी गेले ही बाब उघड झाली नव्हती. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत या घटनेची तक्रार कोतवाली झाली नाही. रात्री 8 ते 9 वाजतादरम्यान तहसिलमधील अधिकारी चोरी गेलेल्या साहित्यांचा लेखाजोखा घेऊन कोतवाली पोलिस ठाण्यात पोहोचले होते. रात्री उशिरा या घटनेच्या अनुषंगाने गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. विशाल राजू सिंग राठोड दुय्यम सहनिबंधक यांनी रात्री उशिरा कोतवाली ठाण्यात तक्रार नोंदवली त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. जुन्या तहसील मधील खरेदी विक्री विभाग कार्यालयात ही घटना घडली होती.

# शेतमाल चोरी करणारी टोळी गजाआड

### दोन गुन्ह्यांची कबुली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.27)**- शेतातील शेतमाल चोरी करणाऱ्या टोळीला अटक करण्यात शिरजगाव पोलिसांना 27 सप्टेंबर रोजी यश मिळाले. गजानन ऊर्फ गुड्डु सुदाम बेठकर (24), अनिल सुकराम भलाबी (23), आनंद ऊर्फ बंटी रमेश मेटकर (24) व गेदलाल कामु उईके (24, सर्व रा. खरपी) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांनी दोन गुन्ह्यांची कबुली दिली असून, त्यांच्या ताब्यातून 19 लाख 34 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.



शिरजगांव (कसबा) पोलिस ठाण्यात सागर विश्वास शेळके (रा. सालेपुर) यांनी तक्रार दिली होती की, त्याच्या शेतातून अज्ञात आरोपीतांनी 40 ते 50 कॅरेट संत्रा (किमंत 20 हजार) तोडुन चोरून नेला. या तक्रारीवरून शिरजगांव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरूध्द भारतीय न्याय संहीता कलमान्वये गुन्हा नोंदविला होता. शिरजगांव ठाण्यातील पोलिस पथकाला गुप्त माहिती मिळाली की, या गुन्ह्यात गजानन ऊर्फ गुड्डु बेठकर, अनिल भलाबी, आनंद ऊर्फ बंटी मेटकर, गेदलाल उईके यांचा हात आहे. या माहितीवरून पोलिसांनी चौघांनाही ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींनी शिरजगांव हद्दीतील आणखी 2 शेतमाल चोरीचे गुन्हे केले असल्याची कबुली दिली आहे. एकुण 19 लाख 34 हजार रुपये किमंतीचा माल जप्त करण्यात आले आहे.

# जाती-धर्माच्या चक्रव्यूहातून बाहेर पडा-प्रा.श्याम मानव

## अमर रहे, अमर रहे, संजय बंड अमर रहे, च्या घोषणांनी सभागृह दणाणले

### अभिवादन सोहळ्यात स्व. संजय बंड यांच्या स्मृतींना उजाळा




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.27)** - माणूस म्हणून जगण्याचा सर्वांना अधिकार आहे. राजे, महाराजे तथा तत्कालीन महापुरुषांना जातिभेदाचा कलंक लावून समाजातील विशिष्ट घटकांनी आपला स्वार्थ साध्य केला. आजही ही लोकं जाती, धर्मात तेढ निर्माण करत आहे. जाती, धर्माच्या चक्रव्यूहातून बाहेर पडत माणसांचे राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न करा, ते खरं सुराज्य असेल असे प्रतिपादन अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रमुख प्रा. श्याम मानव यांनी केले. लोकनेते माजी आमदार स्व. संजय बंड यांच्या जयंती निमित्त अभिवादन सोहळ्याचे आयोजन दि.27 सप्टेंबर 2024 रोजी ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे करण्यात आले होते. यानिमित्त्याने महाराष्ट्र बचाओ-संविधान बचाओ अभियान अंतर्गत प्रा. श्याम मानव, संस्थापक संघटक, अ. भा.अंधश्रद्धा निर्मूलन समिती तथा ज्येष्ठ राजकिय विश्लेषक यांचे प्रबोधनपर व्याख्यान घेण्यात आले. या कार्यक्रमाला प्रसिद्ध वक्ते दशरथ मडावी, अनिस चे कार्याध्यक्ष सुरेश झुरमुरे, शिवसेनेच्या नेत्या प्रीती संजय बंड, हरीश केदार, गणेश हलकारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### तर आज अनेक लोक तुरुंगात असते




‘संविधान बचाव, महाराष्ट्र बचाव’ या विषयावर पुढे बोलताना प्रा. श्याम मानव म्हणाले की, हुकूमशाहीला आपण आवर घालू शकतो हे लोकसभेच्या निवडणुकीतून दाखवून दिले आहे. मोदी सरकार बहुमतात असतं तर आज अनेक लोक तुरुंगात असते असं वातावरण या ठिकाणी निर्माण झालं होतं. परंतु महाराष्ट्राने त्यांचे हे स्वप्न पूर्ण होऊ दिले नाही. देशात आज विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात चुकीचे व अवैध काम सुरू आहेत. कायद्याचा धाक लोकांना राहिला नाही याकरिता सध्याचे भाजप सरकार जबाबदार असल्याचेही मानव यांनी सांगितले.

### 2014 नंतर हुकूमशाही



आदिवासी समाजासोबतच अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीत 40 वर्ष सेवा करणारे दशरथ मडावी यांनी आपल्या ओजस्वी वाणीतून धर्मांध लोकांवर प्रकर टीका केली.या देशाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान दिलं. या संविधानामुळेच आपला देश एक संघ आहे. या ठिकाणी सर्व लोक गुण्यागोविंदाने राहतात. 2014 पर्यंत या देशात लोकशाही होती परंतु त्यानंतर हुकूमशाही कडे वाटचाल सुरू झाली. देशाला हुकूमशाही कडे नेणाऱ्या लोकांना हद्दपार केले पाहिजे. लोकसभेसारखेच येत्या विधानसभेत सुद्धा महाराष्ट्रातील जनतेनी संबंधितांना घरी बसविण्याची हीच ती योग्य वेळ असल्याचे दशरथ मडावी यांनी सांगितले.

### शेवटच्या घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला



आपल्या स्वागताध्यक्षीय भाषणात बोलताना याप्रसंगी शिवसेनेच्या नेत्या प्रीती संजय बंड यांनी स्व.संजय बंड यांच्या स्मृतींना उजाळा दिला. संजय बंड हे लोकनेते होते त्यांनी समाजातील शेवटच्या प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. आपण किती जगलो यापेक्षा या जीवनात आपण काय केलं याबद्दल समाधान व खूप चांगले अनुभव मला आलेले आहे. माणसाचे मूल्यमापन करताना तो किती जगला यापेक्षा तो कसा जगला याला महत्त्व आहे. संजू भाऊ बंड यांच्या निधनानंतर तुम्ही मला जो धीर दिला,जे प्रेम दाखविले त्याबद्दल मी आपली सर्वांची ऋणी आहे. संजय बंड यांनी जे कार्य केले ते पुढेही आपण सुरू ठेवू. मला संजय बंड यांची पत्नी असल्याचा सार्थ अभिमान आहे. आपले प्रेम आणि सहकार्य मला नेहमीच लाभो अशी इच्छा व्यक्त करत त्यांनी उपस्थितांना धन्यवाद दिले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश हलकारे यांनी तर संचलन हरिष केदार यांनी केले.

# पोट पुजा करत चोरट्यांनी घर नेले धुवून

### एकाच रात्री तीन घर फोडले

### चांदुर बाजारात चोरट्यांची दहशत

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,(दि.27)**- तालुक्यात सध्यास्थितीला चोरट्यांची मोठी दहशत वाढली असून एका घटनेत चोरट्यांनी घर फोडले, जेवण केले अन् ऐवजही लंपास केला. चांदूर बाजारात गेल्या दोन दिवसात एकाच रात्रीत तीन घरांना अज्ञात चोरट्यांनी लक्ष करत चोरी केली. गेल्या आठवड्यात

गवळी पुर्यातील क्वालीटी चिकन दुकान व घरी 1 लाखांच्या चोरीच्या घटनेतील चोरट्यांचा तपास लागलेला नसताना पुन्हा तीन घरफोडी झाल्याने चांदूर बाजार पोलिसांसमोर चोरट्यांनी मोठे



आव्हान उभे केले आहे.

चांदूर बाजारातील आनंदनगर, छत्रपतीनगर परिसरात चोरट्यांनी एकाच रात्री तीन घरांना लक्ष्य बनविले. ज्यात पहिल्या चोरीच्या घटनेची माहिती मिना ठाकरे यांना त्यांच्या कॉलनीत राहणार्या रविंद्र चौधरी यांनी फोनवर दिली.

घर मालक आपले नातेवाईकांकडे एका कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गेले होते. घराला कुलुप लागल्याचे दिसताच चोरट्यांनी मागिल दाराने प्रवेश करुन चोरी केली. यात चोरट्यांनी रोख 5 हजार रुपये तथा 6 ग्रॅम सोन्याचे आभुषण असा मुद्देमाल लंपास केला. याच ठिकाणी चोरट्यांनी जेवणावरही ताव मारला.

अन्य एका घटनेत सुरेन्द्र दवे यांचे कुटूंब काकाकडे अंत्यसंस्काराच्या कार्यक्रमात गेले होते. हीच संधी साधून चोरट्यांनी घरातील साहित्य लंपास केले. सुदैवान घर मालकाच्या घरी ठेवलेले दागीने व रोख वाचली. तिसर्यात घटनेत चोरट्यांनी अजाबराव मोहीते यांची बजाज डिस्कवर (एमएच 35-एक्स 0178) बाईक लंपास केली. चोरट्यांनी पोलिसांपुढे आव्हान उभे केले असून पोलिसांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे.

### चिमुकल्याच्या खाऊचे पैसेही चोरले

चांदुर बाजार मधील छत्रपती नगर निवाशी सुरेन्द्र दवे यांच्या बालकाने आपल्या गल्ल्यात सुमारे अडीच हजाराच्या दरम्यान जमा केलेली रोख राशीवरही या चोरट्यांनी हात साफ केला, तर बालकाच्या वाढदिवसा निमित्त भेट स्वरुपात मिळालेळी सोन्याची अंगठी, पेन्डाल, आदी लहान, लहान सोन्याचे आभुषण चोरुन नेले.

Bandhan Bank | रीजनल ऑफिसः नेताजी मार्ग, मिठाकली सिक्स रस्त्यांजवळ, एलिसब्रीज, अहमदाबाद-06. फोन: +91-79-26421671-75

**प्रतीकात्मक ताबा सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की सेक्युरिटायझेशन अँड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 या अधिनियमांतर्गत आणि कलम 13(12), सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचून त्याअन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन, प्राधिकृत अधिकाऱ्याने खालिल खात्यासमोर नमूद दिनांकेला मागणी नोटिस कर्जदार निर्गमित केली असून त्यात कथित सूचना मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत ती रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती. कर्जदारांनी कर्जाची परतफेड न केल्यामुळे याद्वारे कर्जदारांना, आणि सर्वसाधारण जनतेला नोटिस देण्यात येते की खाली सही करणाऱ्याने येथे खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा, कथित अॅक्टचा सेक्शन 13(4) हा, कथित नियम 8 सह वाचला असता त्याखाली त्याला दिलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली दिलेल्या खात्यासमोर निर्देशित केलेल्या तारखेला घेतलेला आहे. याद्वारे कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला मालमत्तेसंबंधात कोणताही व्यवहार न करण्याचा सावधगिरीचा इशारा देण्यात येत आहे आणि मालमत्तेबाबत करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा रक्कम, व्याज, खर्च आणि शुल्कसाठी बंधन बँक लिमिटेडच्या प्रभारांच्या आधीन असेल. प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी, उपलब्ध वेळेच्या संबंधात, अधिनियमाच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे/मोर्टगेजरचे लक्ष वेधण्यात येत आहे.

| कर्जदाराचे नाव, हमीदार आणि कर्ज क्रमांक | मालमत्तेचे वर्णन (सुरक्षित मालमत्ता) | मागणी नोटिसेची दिनांक | प्रतीकात्मक ताबा दिनांक | मागणी सूचनेच्या खाते दिनांकेला थकित रक्कम |
|---|---|---|---|---|
| श्री.नवलसिंग मौजी सावळकर<br>सौ.द्रोपदी नवलसिंग सावळकर<br>श्री.राजेश केवट<br>20005030002214 | प्लॉट नं.4 ए, शीट सर्व्हे नं.120/1, मौजा-कांडली रश्मी नगर परतवाडा द-परतवाडा,जिल्हा-अमरावती, महाराष्ट्र येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे:<br>उत्तर: लेआउट रोड, पूर्व: रस्ता, पश्चिम: प्लॉटचा उर्वरित भाग, दक्षिण: प्लॉट क्र.13/ए | 07.05.2024 | 24.09.2024 | रु.3,10,646.87 |
| श्री.नरेंद्र अजबराव सोळंके<br>सौ.मंदा नरेंद्र सोळंके<br>20005030005218 | प्लॉट नं.68, सर्व्हे नंबर 4/2 अंबा विहार रोड, मौजे-महाजनपुरा, पाण्याच्या टाकी जवळ, तेह आणि जिल्हा-अमरावती, महाराष्ट्र येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे:<br>उत्तर: त्याच प्लॉटचा उर्वरित भाग, पूर्व: लेआउट रोड, पश्चिम: सर्व्हिस लेन, दक्षिण: भूखंड क्र.69 | 07.05.2024 | 25.09.2024 | रु.14,24,496.36 |

स्थळ: अमरावती
तारीख: 28/09/2024
अधिकृत अधिकारी
बंधन बँक लिमिटेड

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# दुपटीचा निर्णय, पण 7 महिन्यांपासून मानधन नाही

## सरपंच, उपसरपंच बनले बिन पगारी, पुर्ण अधिकारी / सदस्यांची तर केवळ चहापानावरच बोळवण

**बादल डकरे**
**चांदूर बाजार,( दि.27 )-** असे म्हणतात की, ग्रामपंचायतमधील राजकारण मंत्रालयाचे भविष्य ठरविते. हे बऱ्याच प्रमाणात सत्य आहे. ग्रामपंचायतमध्ये एक-एक सदस्य निवडूण आणण्याकरिता मोठी कसरत आणि व्यूहरचना केली जाते. आता राज्य सरकारने सरपंच व उपसरपंचांच्या मानधनात दुपटीने वाढ केली, त्यामूळे या पदाचे वजन आणखीनच वाढले, मात्र वास्तवात सध्यास्थितीला सरपंच व उपसरपंचांना 7 महिन्यांपासून मानधनच दिलेले नसल्याने, त्यांची भूमिका बिन पगारी अन् पुर्ण वेळ अधिकारी अशी ठरत आहे. राज्य सरकारच्या वेतनवाढीच्या घोषणेनंतर दुसरीकडे ग्रा.पं. सदस्यांच्या आशाही पल्लवीत झाल्या आहे. केवळ चहापानावर बोळवण न करता आम्हालाही मानधन द्यावे अशी मागणी त्यांच्याकडून होत



आहे.

ग्रा.पं.सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी गावातील राजकारणात मोठी चुरस असते. सदस्य झाले म्हणजे कोणता लाभ होईल यापेक्षा गावात मान वाढेल याचे समाधान असते. त्यातल्या त्यात सरपंच निवड आरक्षणानुसार सदस्यमधून होत असल्याने कोणत्याही पॅनलला बहुमत असले व त्या प्रवर्गाचा सदस्य त्यांच्याकडे नसल्यास कमी सदस्य असलेल्या पॅनलचाही सरपंच म्हणून निवडला जातो. त्यामुळे सदस्यांना निवडून येणे ही जमेची बाजू मानली जाते. ग्रा.पं.सदस्य म्हणून निवडून आले तरी त्यांना मानधन नसते. ग्रामपंचायतमध्ये सरपंच- उपसरपंच यांना गावाच्या लोकसंख्येनुसार मानधन दिले जाते. मात्र सदस्यांना मानधन काही नसते. मात्र आता राज्य सरकारने सरपंच आणि उपसरपंच यांचे दुप्पट करण्याचा निर्णय घेतला पण मानधन मागील 6 महिन्यापासून सरपंचांचे मानधन जमाच केले नसल्याने केवळ मानधनात दुपटीची घोषणा निवडणूक डोळ्यापुढे ठेवून तर करण्यात आली नाही ना, असाही प्रश्न गाव पुढाऱ्यांना पडला आहे.

### असे होणार मानधनात वाढ

ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या 2 हजार पर्यंत आहे, त्या सरपंचाचे मानधन 3 हजार रुपयावरुन 6 हजार रुपये करण्यात येणार आहे. तर ज्या उपसरंपचाचे मानधन 1 हजार रुपये आहे, त्यांना 2 हजार रुपये मानधन देण्यात येईल. तसेच ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या 2 ते 8 हजार पर्यंत आहे, त्या सरपंचाचे मानधन 4 हजार रुपयांवरुन 8 हजार रुपये करण्यात आली आहे. तर उपसरपंचाचे मानधन 1500 रुपयावरुन 3 हजार रुपये करण्यात आले आहे. तसेच ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या 8 हजार पेक्षा जास्त आहे, त्या सरपंचाचे मानधन 5 हजार रुपयांवरुन 10 हजार रुपये करण्यात आले आहे. अशीच वाढ उपसरपंचांच्या बाबतीतही करण्यात आली आहे. या मानधनवाढीमुळे राज्यशासनावर वार्षिक 116 कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार आहे. 30 जुलै 2019 ला तत्कालीन राज्य सरकारने सरपंच, उपसरपंच यांच्या मानधनात वाढ केली होती, मात्र तेव्हा देखील सदस्यांची चहापानावर बोळवण केली, आताही 6 वर्षानंतर तीच परिस्थिती आहे.

> मागील सात महिन्यापासून सरपंचांचे नियमित मानधन मिळाले नाही, त्यात राज्य सरकारने मानधन दुपटीचा जो निर्णय घेतला आहे, तो समोर होणाऱ्या निवडणुकांना डोळ्यासमोर घेण्यात आला, हे स्पष्ट दिसून येत आहे.
>
> **पल्लवी राहुल वाटणे,**
> **ग्रामपंचायत राजुरा लहान सरपंच.**

> सरपंच, उपसरपंच यांची निवड सदस्यामधून केली जाते, तसेच गावाच्या विकास कामात एकटा सरपंच, उपसरपंच हा काहीच करू शकत नाही. त्यांना कुठलाही ठराव घेण्यासाठी सदस्य संख्या आवश्यक असते. मग केवळ सरपंच आणि उपसरपंच यांचे मानधन दुप्पट करून सरकार ला सदस्यांना कमी लेखायचे असावे असे या निर्णय वरून दिसून येत आहे.
>
> **बाळू पोटे ग्रामपंचायत, सदस्य देऊरवाडा.**

# रस्ता चुकलेली ती मुले सापडली ताजनगरात

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.27 )-** नागपुरी गेट हद्दीतील दोन अल्पवयीन मुले शुक्रवारी सकाळी शाळेत पोहोचले नाही. त्यामुळे आई-वडिल काळजीत पडले. त्यांनी पोलिसांकडे धाव घेऊन याबाबतची माहिती दिली. त्यानंतर ती दोन्ही मुले शुक्रवारी ताज नगर परिसरात एका गल्लीमध्ये मिळून आले.

27 सप्टेंबर रोजी सकाळी 9.30 वाजताच्या सुमारास नागपुरी गेट पोलिस ठाण्यात ड्युटी ऑफिसर सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली चव्हाण या कर्तव्यावर हजर असताना, त्यांच्याकडे रुबीना मोहम्मद मंजूर (30, रा. गुलिस्ता नगर, अमरावती) ही महिला घाबरलेल्या अवस्थेत आली.

त्यांनी माहिती दिली की, त्यांनी 11 व 9 वर्षीय या दोन्ही मुलांना असोसिएशन उर्दू स्कूल शाळेत पाठवायसाठी घराजवळील गुलिस्ता नगर स्कूलबस थांब्यावर सकाळी 07.45 वाजता सोडून दिले. त्यानंतर त्या गेल्या. त्यानंतर त्यांना माहिती पडले की, दोन्ही मुले ही शाळेत पोहोचली नाही आणि घरी सुध्दा परतली नाही. त्यामुळे ते बेपत्ता झाली किंवा त्यांचे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केले. पोलिसांनी वेगवेगळ्या परिसरात त्यांची छायाचित्र लोकांना दाखविली. त्यानंतर सुमारे 30 ते 40 विविध सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून दोन तास मुलांचा कसोशीने तपास केला. दरम्यान ते दोन्ही मुले गुलिस्ता नगर येथील एका सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसले. पोलिसांनी त्या परिसरातील 50 ते 60 रहिवाशांना मुलांचे छायाचित्रे दाखवून शोध घेतला असता दोन्ही मुले हे ताज नगर परिसरात एका गल्लीमध्ये दुपारी 12 वाजताच्या सुमारास गोंधळलेल्या अवस्थेत मिळून आले.


## तरुणीला शारिरिक सुखाची मागणी

**अमरावती-** पैशांचे आमिष दाखवून एका तरुणीला शारिरिक सुखाची मागणी करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार येवदा पोलिस ठाण्याच्या हद्दीत 26 सप्टेंबर रोजी उघडकीस आला. 20 वर्षीय पिडित तरुणीच्या तक्रारीवरून येवदा पोलिसांनी आरोपी आदित्य सुरेश भुरे (रा. ता. दर्यापूर) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पिडितेच्या तक्रारीनुसार, दर्यापूर येथील रहिवासी 20 वर्षीय तरुणी ही घरी एकटी असताना, आरोपी हा तिच्या घरी गेला आणि त्याने तरुणीला पैशांचे आमिष दाखवून शारिरिक सुखाची मागणी केली. यावरून पिडित मुलीने म्हटले की, मी तुझ्या आईला सांगेन, असे म्हटले. तिने आरोपी तरुणाला त्याच्या आईजवळ नेले. त्यावेळी त्याने तरुणीचा हात पकडून तिला थापडा मारल्या आणि अश्लिल शिविगाळ केली.

# धनेगाव येथे विद्युत खांबावर कोसळली वीज

## अनेक घरातील विद्युत उपकरणे निकामी

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.27 )-** गेल्या तीन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामध्ये विजांचा प्रचंड तांडव सुरु असून तालुक्यातील धनेगाव येथे वीज खांबावर कोसळून अनेक नागरिकांच्या



घरातील विजेची उपकरणे निकामी झाले. परंतू या नंतरही प्रशासनाकडून कोणतीच दखल न घेतल्यांने नागरिकांनमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे.

धनेगाव ग्रामपंचायत परिसरात बुधवार रात्री 9-30 वाजताच्या दरम्यान पावसात विद्युत खांबावर वीज पडली. ग्रामपंचायत परिसरात या घडलेल्या या घटनेत विजेच्या तीव्र आवाजाने नागरिकांच्या कानठळ्या बसल्या, यातून सावरल्यावर नागरिकांना घरातील अनेक वीज उपकरणे निकामी झाल्याचे कळले. या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याची माहिती आहे. परंतू आतापर्यंत महसूल प्रशासनाने या आपत्तीची कोणतीच पाहणी केली नसल्याचे समजते.

# वसंतराव गासे यांचे निधन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.27 )-** नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील चोर माहूली येथील प्रतिष्ठीत व्यक्ती वसंतराव मा.गासे यांचे शुक्रवार (दि.27) रात्री 8 वाजताच्या सुमारास निधन झाले. मृत्यूसमयी ते 70 वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी त्यांच्या राहते घरुन माहूली चोर येथून निघेल. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन विवाहित मूली, नातू असा मोठा आप्तपरिवार आहे.



# स्वच्छता दौड स्पर्धा आज

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.27 )-** नगर परिषद मोर्शी द्वारा स्वच्छता पंधरवडा अंतर्गत दि.14 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याच श्रुंखलेत उद्या दि.28 सप्टेंबर 2024 रोजी मोर्शी नगर परिषद आणि उपविभागीय पोलीस कार्यालय यांचे संयुक्त विद्यमाने स्वच्छता दौडचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वच्छता दौड दिनांक 28 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 7 वाजता सिंभोरा चौक ते सिंभोरा रोडच्या दिशेने स्वच्छता दौडचे आयोजन करण्यात आले. सिंभोरा चौक येथे आ.देवेन्द्र भुयार यांचे हस्ते शुभारंभ होणार आहे. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी प्रविण पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल चौधरी, भारतीय महाविद्यालयाचे प्रा.रजनीश बांबोडे, आर.आर.लाहोटी विज्ञान महाविद्यालयाचे प्रा.डॉ.गजानन चौधरी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यामध्ये 14 ते 18 वयोगटातील मुले व मुली यांची 5 किमी धावण्याची स्पर्धा, 18 वर्षावरील मुले व मुली यांची 5 किमी. धावण्याची स्पर्धा व 50 वर्षावरील स्त्रिया व पुरुषांची 3 किमी चालण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सर्व स्पर्धकाना नगर परिषद मार्फत प्रशस्तीपत्र, टी शर्ट व विजत्यासाठी आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहे. यामध्ये 14 ते 18 वर्ष वयोगटातील एकूण 324 स्पर्धक,18 वर्षावरील वयोगटातील एकूण 40 स्पर्धक व 50 वर्षावरील वयोगटातील 25 स्पर्धक भाग घेतला आहे. विजेता स्पर्धकाना दिनांक 2 ऑक्टोबर 2024 रोजी बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

या स्वच्छता दौड मध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घेण्याचे आवाहन तहसीलदार तथा नगरपरिषदेचे प्रशासक राहुलजी पाटील, नगर परिषदेचे मुख्याधिकारी पराग वानखडे व नगर परिषदेच्या ब्रँड अँम्बेसेडर श्रीमती पूनम राहुल मोहोड यांनी केले आहे. सदर कार्यक्रम करीता नगर परिषद मोर्शी येथील कार्यालय अधीक्षक अमोल ढोले, भूषण पावडे, अश्विनी खिराडे, अर्चना बडगे, मिनेश सूर्यवंशी व नगर परिषद कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## मद्यपीने केला महिलेचा विनयभंग

**येवदा-**पोलिस ठाण्याच्या हद्दीत महिला विनयभंगाची दुसरी घटनाही उघडकीस आली आहे. 30 वर्षीय विवाहित महिला घरी झोपली असता, तिच्या घरात दोन इमस हे मद्यधुंद अवस्थेत शिरले आणि त्यांनी महिलेशी अश्लिल चाळे करण्याचा प्रयत्न केला. महिलेने विरोध केला असता, त्यांनी महिलेला काठीने मारहाण केली आणि तिच्या पतीलादेखील लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेची तक्रार पिडित महिलेने येवदा पोलिस ठाण्यात 26 सप्टेंबर रोजी नोंदविली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी दादाराव गणपतराव प्रभे व सदानंद दादाराव प्रथे (दोन्ही रा. दर्यापूर तालुका) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत कधी?

## भाजप कडून निवेदन

**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड,( दि.27 ) -** नैसर्गिक आपत्तीमूळे सोयाबीन कपाशी, तूर पीकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अनुदानापोटी हेक्टैरी 5 हजार रुपये तर संत्रा उत्पादकांना हेक्टरी 36 हजार रुपये मदत देण्याचे जाहीर केले होते. परंतु प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे अजूनपर्यंत शेतकऱ्यांना पैसे प्राप्त झाले नाही, त्यामुळे



भारतीय जनता पक्षातर्फे झोपलेल्या प्रशासनाला जागी करण्याकरिता तहसिलदारांना निवेदन देत चर्चा करण्यात आली.

निवेदन दिल्यानंतर झालेल्या चर्चेअंती तांत्रिक बाबी दूर करून येत्या आठ- दहा दिवसांमध्ये पैसे देण्याचे आश्वासन तहसीलदार राहुल पाटील यांनी दिले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण राऊत, राहुल चौधरी, उमेश कोंडे, प्रमोद हरणे, गोपाल मालपे, युवा मोर्चा अध्यक्ष नितीन चिखले, राजु सावरकर, मनोज कडू, गौरव घोंगडे, विलास आघाडे, नितीन उमाळे, राम जामठे, निलेश नांदुरकर, अभिजित श्रीराव, युवराज अंधारे, निलेश पू.अंधारे, विनय अंधारे, अंकुश धावडेसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वच्छता मॅरेथॉनमध्ये धावले दर्यापूरकर

## न.प.स्वच्छता ही सेवा अभियानाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर,( दि.27 )-** नगर परिषद तर्फे दि. 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2024 पर्यंत स्वच्छता ही सेवा हे अभियान राबविल्या जात आहे. यामध्ये विविध उपक्रम स्वच्छतेच्या अनुषंगाने साजरे केले जात आहेत. 26 सप्टेंबर ला स्वच्छता मॅरेथॉन आयोजित करण्यात आली होती. यामध्ये गट अ 18 ते 30 वर्ष व



31 ते 50 वर्षे वयोगटातील महिला, गट ब 18 ते 30 वर्षे व 31 ते 50 वर्षे वयोगटातील पुरुष तसेच गट क मध्ये 51 वर्षावरील सर्वांचा पुरुष /महिलांसाठी जलद चालण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यासाठी सर्व गटांकरिता प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्यांना रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन दि.2 ऑक्टोबर 2024 ला सत्कार करण्यात येणार आहे.

सकाळी ठीक 7 वाजता या स्पर्धेला नगर परिषद कार्यालयापासून सुरुवात झाली भातकुली टी पॉईंट पर्यंत जाणे व तेथून पुन्हा परत येणे असा हा 3 किमी. अंतर स्पर्धकांसाठी ठेवण्यात आले होते. शहरातील सर्व क्षेत्रातील नागरिकांनी यामध्ये भाग घेऊन नगर परिषद ने सुरु केलेल्या स्वच्छता म्यॅरेथान स्पर्धेत सहभाग नोंदवला.

न.प. ने सुरु केलेल्या या स्वच्छता हीच सेवा या अभियानाला दर्यापूरकरांनी सहकार्य करावे व आपल्या शहराला स्वच्छ व सुंदर ठेऊन आपल्या शहराचा गुणगौरव वाढवावा असे झाल्यास आपल्या शहराचे नाव राज्य स्तरावर, केंद्रस्तरावर झळकेल व आपलाही गौरव वाढेल यासाठी प्रत्येकाने या अभियानामध्ये सहभागी होण्याचे आवाहन मुख्याधिकारी नंदू परळकर यांनी केले. यावेळी दिवाणी व फौजदारी न्यायालयचे न्यायधीश,पोलीस स्टेशनचे ठाणेदार वानखडे साहेब,सेंट्रल बँक इंडिया शाखा प्रमुख मनोज सूर्यवंशी, मुख्याधिकारी नंदू परळकर न. प. चे स्वछता दूत प्रा. गजानन भारसाकळे हे सर्वां सुद्धा या स्पर्धेत सहभागी होऊन धावले. या स्पर्धेत शहरातील विद्यार्थी, पुरुष, महिला व जेष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला.

# शिंदी बु. गावाला अतिक्रमणाचा विळखा

## अनेक प्रतिष्ठितही अतिक्रमणधारक ■ आमरण उपोषणाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट,( दि.27 ) -** अचलपूर तालुक्यातील शिंदी बु. गावातील सर्व मुख्य रस्ते प्रतिष्ठित प्रस्थापितांनी गिळंकृत केल्यामुळे अर्धे अधिक गाव अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले आहे. एवढेच नव्हे तर शासकिय स्वस्त धान्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनास प्रचंड अडचणी निर्माण होत आहेत, याविषयी पंचायत समिती बिडीओ सह जि.प. मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हाधिकारी व पालकमंत्र्यांकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत.

शिंदी बु.येथील अतुल सुरेशराव लहाने यांनी दिलेल्या




तक्रारीनुसार ते शासकीय स्वस्त धान्याचे दुकान चालवत असून या दुकानापर्यंत माल पोहोचविण्यासाठी ज्या रस्त्याने शासकीय स्वस्त धान्याचे वाहन आणावे लागते, या मार्गावर कमला पांडुरंग पवार, अरविंद पवार, गजानन लांडे यांनी अर्धेअधिक अतिक्रमण केले आहे. एवढे नव्हे तर ज्या ठिकाणी लहाने यांना स्वस्त धान्याचे दुकान स्थानांतरित करायचे आहे. त्या जागेवरसुद्धा अरविंद पवार यांनी अतिक्रमण केले आहे. याविषयी अतुल लहाने यांनी ग्रामपंचायत शिंदी बु. सह बिडीओ अचलपूर यांच्याकडे अनेकदा तक्रारी केल्या आहेत.

तक्रारींवर सहा महीण्यांचा कालावधी उलटला तरी साधी मोक्का पाहणीसुद्धा करण्यात आली नाही. तर अरविंद पवार यांना घरावर स्लॅब टाकतेवेळी सकाळी 9 वाजता शिंदी बु. ग्रामपंचायत कडून नोटीस बजावण्यात आली होती. तरीही त्याचा विचार न करता सबधित व्यक्तीने अतिक्रमण करून घराचे बांधकाम केले आहे. वारंवार तक्रारी करूनही अतिक्रमण धारकांवर कसलीही कारवाई होत नसल्याने प्रशासनाला आठ दिवसांचा अल्टीमेटम देत अतुल लहाने यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे. तक्रारींच्या प्रत मेळघाट आ. राजकुमार पटेल, उपविभागीय अधिकारी अचलपूर, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी व पालकमंत्र्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# फिरत्या विज्ञान प्रदर्शनी ची अंबाडा ग्रामविकास स्कूल ला भेट

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.27 ) -** रमण सायन्स केंद्र नागपूर मार्फत फिरते वैज्ञानिक प्रतिकृतीचे उद्घाटन ग्रामविकास विद्यालय अंबाडा येथे करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व आरोग्याच्या सवयी, संतुलित आहाराचे महत्व इत्यादी बाबत प्रतिकृतींचा यामध्ये समावेश करण्यात आला होता.

नागपूर येथील रमण विज्ञान केंद्र हे कलकत्त्याच्या राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषदेचा एक घटक असून नेहरू विज्ञान केंद्र मुंबईशी संलग्न आहे. या केंद्राचे संचालन संस्कृती मंत्रालया




अंतर्गत करण्यात येते. तसेच नेहरू विज्ञान केंद्र मुंबईशी हे संलग्न आहे.

विदर्भातील जनता आणि विद्यार्थ्यांमधील विज्ञान लोकप्रिय करण्यासाठी 1989 मध्ये हे केंद्रस्थापित करण्यात आले. ग्राम विकास विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उपयुक्त माहिती इतर विद्यार्थ्यांना या प्रतिकृतीच्या माध्यमातून करून देण्यात आली. मुख्याध्यापक अविनाश साळकर तथा पर्यवेक्षक अविनाश फुटाणे यांच्या हस्ते या फिरत्या वाहनाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी विज्ञान शिक्षक हर्षल आमले, सुनील खोडस्कर, प्रशांत लोखंडे उपस्थित होते.